# <u>महानगर दंडाधिकारी यांचे ६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.</u>

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १९०३/पीएस/२०२४
गुन्हा क्रमांक – ९९६/२०२२

## <u>नि. १ वर आदेश.</u>

आरोपीने स्वतःहुन त्याचा गुन्हा कबूल केला आहे. त्याने त्याची कमीत कमी दंडावर मुक्तता करण्यात यावी अशी या न्यायालयास विनंती केली आहे. मी आरोपीला त्याचेवर कोणाचा दबाव आहे काय? व तो स्वतःहुन गुन्हा कबूल करतो आहे काय? अशी विचारणा केली व गुन्हा कबूल केल्यास त्यास शिक्षा होऊ शकते याची कल्पना दिली व त्यास पुर्नविचार करण्याची संधी दिली, परंतू, तो त्याचेवर कोणचाही दबाव नाही व त्याला स्वतःहुन गुन्हा कबूल करावयाचा आहे असे कथन करीत आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी स्वतःहुन गुन्हा कबूल करीत आहे व त्याचेवर कोणाचाही दबाव नाही. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: <u>आ दे श</u> :**

१. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला भारतीय दंड संहिताचे कलम २७९ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला ५००/– रूपये (पाचशे रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला १५ (पंधरा) दिवसांचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

२. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला भारतीय दंड संहिताचे कलम ३३७ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला ५००/– रूपये (पाचशे रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला १५ (पंधरा) दिवसांची साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

३. आरोपीला आदेशाची प्रमाणित प्रत विनामूल्य पुरविण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला)

**सही/-**

**(एस. एम. ए. सय्यद)**
महानगर दंडाधिकारी
६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई

दिनांक : ०३–०३–२०२४